**नियमित दिवाणी दावा क्र. ९१/ २०२३**

*CNR No. MHSO060020792023*

अभिजीत सावंजी

*वि.*

जिल्हाधिकारी, सोलापूर व इतर

## निशाणी क्र. ३० वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ यांनी वादीचे दाव्यास व निशाणी ५ वरील अर्जास म्हणणे देण्यास मुदत देणेकामी दाखल केलेला आहे. या अर्जाच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. ३ चे विधीज्ञ श्री. भोसले सकाळच्या सत्रात न्यायालयासमोर आले व त्यांनी हा अर्ज दाखल केला. अपरीपक्व प्रकरणे दुपारचे सत्रात चालविले जातात असे त्यांना सांगण्यात आले. त्यावेळेस त्यांनी प्रकरणाच्या अनुषंगाने न्यायालयास सांगितले की, यातील वादीचे विद्युत कनेक्शन प्रतिवादी क्र. ३ ने तोडलेले आहे. यावर त्यांना प्रतिवादी क्र. ३ यास न्यायालयासमोर हजर ठेवून सदरील बाब त्याचे शपथेवर नमूद करण्यास सांगण्यात आले. दुपारच्या सत्रात प्रतिवादी क्र. २ चे विधीज्ञ, वादीचे विधीज्ञ व सहाय्यक सरकारी अभियोक्ता हजर झाले. दुपारच्या सत्रात वादीतर्फे प्रतिवादी क्र. ३ यांनी विद्युत कनेक्शनबाबत आहे ती परीस्थिती कायम ठेवावी याकरीता अर्ज दिला, ज्यास प्रतिज्ञापत्र दिलेले नाही. सदरील अर्जास प्रतिवादी क्र. ३ चे म्हणणे आवश्यक आहे. तथापि, वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ३ हे हजर झाले नाहीत. प्रतिवादी क्र. ३ ने वादपत्र खारीज करण्याचा अर्ज सकाळच्या सत्रातच दाखल केला. त्यावर वादीने म्हणणे दिले नाही व वादीने तोंडी तारीख ही त्यांचे म्हणणे देण्यास मागितली. सबब, उपरोक्त बाब पहाता प्रतिवादी क्र. ३ यास त्याचे निशाणी क्र. ५ ला म्हणणे दाखल करण्यास मुदत दिल्यास वादीचा अर्ज हा देखील निकाली काढणे आवश्यक ठरते. या अनुषंगाने वादीस या आदेशाच्या अनुषंगाने निर्देश देणे आवश्यक ठरते की, वाद मिळकतीचे विद्युत जोडणी प्रतिवादी क्र. ३ ने तोडलेली आहे किंवा नाही याचा खुलासा प्रतिज्ञापत्र दाखल करुन

करावा, जेणेकरुन या अर्जासह वादीच्या अर्जावर योग्य तो आदेश पारीत करणे उचित होईल. करीता खालील आदेश.

**आदेश**

१. वादीने उपरोक्त निरीक्षणाप्रमाणे त्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करावे.

२. वादीचे प्रतिज्ञापत्र आल्यानंतर हा अर्ज पुढील आदेशाकरीता ठेवण्यात यावा.

NILESH SUBHASH BUDRUK
Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK
Date: 2023.10.20 17:05:42 +0530

दि. २०.१०.२०२३

( नीलेश सु. बुद्रुक )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,
पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar, Grade – II |
| Name of the Court | : | 2nd Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 20/10/2023 |
| Order uploaded on | : | 20/10/2023 |